
94

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
March - 2019 Special Issue - 170

## New Trends in Languages, Social Sciences and Commerce




ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1996 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur. GADHINGLAJ

**Guest Editor :**
Dr. Niwas Jadhav
Principal,
Raja Shiv Chhatrapati Arts & Commerce College, Mahagaon,
Tal. Gadhinglaj Dist. Kolhapur [M.S.] INDIA

**Executive Editor of the issue :**
Dr. Sukumar D. Awale
Smt. Dr. Sugandha Gharpankar
Smt. Dr. Rachana Musai
Prof. Digambar Kapure
Prof. Sandip Ingale
Prof. Ajit Kesarkar

**Chief Editor :**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013) | March-2019
Special Issue 170- New Trends in Languages, Social Sciences and Commerce
UGC Approved Journal

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Labour Conditions in Traditional Sector: A Study of Spinning Mill Workers in Kolhapur District | Dr. Nivas Jadhav & Amar Jadhav | 05 |
| 2 | Feminist Trend in Kiran Desai's The Inheritance of Loss | Mr. D. M. Bhise | 10 |
| 3 | E-Commerce in India: Present Status and Challenges | Prof. Deepak Khedkar & Prof. Ganpat Gaikwad | 15 |
| 4 | Recently Changing Role of Government | Dr. Nivas Jadhav | 20 |
| 5 | Emerging Trends in Social Media | Dr. Dewanand Gadling | 25 |
| 6 | To Study the Recent Trends of Income and Expenditure of Union Government in India | Dr. Sunil Chandanshive & Dr. Nivas Jadhav | 29 |
| 7 | Role of Pradhan Mantri Ujjwala Yojana in Empowerment of Women in India | Prof. Geeta Shete | 37 |
| 8 | The Recent Trends in English Language Teaching and Learning | Sandip Ingle | 41 |
| 9 | Artificial Intelligence (AI): A New Innovation in Banking Industry | Prof. Sachin Janvekar | 46 |
| 10 | Indian Economy Growth Rate and Recent Development | Karuna Raut | 53 |
| 11 | New Technology in Indian Banking Sectror | Mr. Prakash Tone & Dr. Nivas Jadhav | 58 |
| 12 | Emerging Trends in E-Commerce | Mrs. Sunita Patil | 61 |
| 13 | Modern Trends in Literature in the Conditions of Eco-feministic Perspectives | Mrs. Shaikh Jarina Shoukatali | 66 |
| 14 | Emerging New Trends in Marketing Strategies | Prof. Nanda Vasagadekar | 70 |
| 15 | Unified Payment Interface is Emerging Way for Banking Transaction towards Digital India | Prof. Nilkanth Swami & Mr. Mahesh Vandkar | 75 |
| 16 | Gender Discrimination in Arundhati Roy's 'The God of Small Things' | Smt. S. S. Sarmagdum | 81 |
| 17 | Emerging Technology Affecting in College Library Services : in Digital Era | Shri. Samir Kulkarni | 84 |
| 18 | Indian Cotton and the Needs of Spinning Industry | Dr. Nivas Jadhav & Mr. Sanjay Patil | 90 |
| 19 | Islamic Notions in My Name is Salma | Dr. Rachana Vijay Musai | 96 |
| 20 | हिंदी में नव इलेक्ट्रॉनिक जनसंचार मध्यमो का योगदान | डॉ. रंजना कमलाकर | 99 |
| 21 | भाषाओं में उभरती हुई नई प्रवृत्तियाँ | डॉ. हिंदूराव घरपणकर | 102 |
| 22 | समकालीन शिक्षा प्रणाली और दलित सिनेमा | प्रा.वनिता वीरकर | 105 |
| 23 | नदीजोड परियोजना का लेखा –जोखा | डॉ. नेहा देसाई | 108 |
| 24 | हिंदी का वैश्विक परिदृश्य | डॉ. सुगंधा घरपणकर | 111 |
| 25 | 'नळ दवळताना' काव्यसंग्रहातील जागतिकीकरणाचा शोध | डॉ.आनंद वारके | 115 |
| 26 | विज्ञान साहित्याची सकारात्मक चिकित्सा | प्रा. भीमराव शिंदे | 121 |
| 27 | भारतीय निवडणुकांची बदलती परिस्थिती | प्रा. चैतन्य कांबळे | 124 |
| 28 | वंचित बहुजन आघाडी : महाराष्ट्राच्या राजकारणातील उदयोन्मुख प्रवाह | डॉ. डी. एस. क्षीरसागर | 127 |


ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, Gadhinglaj, Dist. Kolhapur. Estd. June - 1986. Reg.No. 2/12863

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 170- New Trends in Languages, Social Sciences and Commerce
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# विज्ञान साहित्याची संकल्पनात्मक चिकित्सा

**सहा. प्रा. भीमराव जोतिबा शिंदे**
मराठी विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर.

**प्रस्तावना-**

मराठी साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले आहेत. साहित्यात वेगवेगळा दृष्टीकोन घेवून लेखन केले जात आहे. विशिष्ट जीवन चित्रण करणे, विशिष्ट जाणीवांचा आधार घेणे, विशिष्ट समाजाचेच चित्रण करणे, विशिष्ट संस्कृतीचा लेखनातून मांडणे, विशिष्ट भूमिका घेवून लेखन करणे, वेगळे लेखन करण्याचा प्रयत्न करणे, विशिष्ट प्रदेशालाच लेखनाच्या केंद्रस्थानी मानने, विशिष्ट वर्गीय चित्रणच करणे, इत्यादी गोष्टींना लेखनातून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न सातत्याने साहित्यात होत असतो. अशा वेगवेगळया भूमिकेतून लेखन करण्याचा प्रयत्न लेखक करतो. अशा लेखकांची परंपरा, अशा लेखनाची परंपरा अस्तित्वात येते आणि साहित्यामध्ये वेगळेपण, वेगळी धाटणी, वेगळा मार्ग, वेगळे प्रवाह दिसू लागतात. अशा प्रकारच्या भूमिकेतून, वेगळेपणातून मराठी साहित्याने विविध प्रकारचे बदल, विविध भूमिका स्वीकारुन वाटचाल केलेली दिसते असे सातत्याने घडू लागले की विविध प्रवाह अस्तित्वात येतात.

मराठी साहित्य जगतात असे घडत आहे, घडलेले आहे. आपल्या मातीच्या, देशाच्या पलिकडच्याही साहित्यसंसाराची नोंद मराठी साहित्याने घेतलेली दिसते. मराठी साहित्यात 'विज्ञान-साहित्य' अशा नावाने ओळखली जाणारी साहित्य संकल्पना अस्तित्वात असलेली दिसते. पारंपारिक साहित्याच्या संकल्पनेपेक्षा या साहित्याची संकल्पना वेगळी आहे. या साहित्याचे स्वरुपही वेगळे असल्याचे दिसते. अशा या विज्ञान साहित्याविषयीची चिंतनात्मक समीक्षा, चिकित्सा या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**विज्ञानसाहित्याची संकल्पना -**

ही संकल्पना मराठी साहित्यात गतकाळातील काही वर्षापासून अस्तित्वात असल्याचे दिसते. तरीही हीचे नाविण्य साहित्यातील नव्या साहित्य संकल्पनेप्रमाणेच साहित्यविश्वाला खुणावत राहिलेले आहे. मराठी साहित्यात अस्तित्वात आलेला एक नवा प्रवाहम्हणून या प्रवाहाकडे पाहिले जाते. 'Science Fiction' या प्रकारातील साहित्यपरकीय साहित्यसृष्टीत, विदेशातील साहित्यसृष्टीत मोटया प्रमाणात आढळताना दिसते. मराठी साहित्यात अवतरलेला हा प्रकार पारंपारिक साहित्यात मोजता येणार नाही. 'Science Fiction' ला नेमके काय म्हणून संबोधले जाते याविषयी वेगवेगळी मते, चर्चा होत असलेली दिसते. डॉ. व दि. कुलकर्णी यांनी सुचविलेले संबोधन म्हणजे 'विज्ञानसाहित्य' हे होय. यशवंत रांजनकरांनी 'विज्ञानकाल्पनिका' असे संबोधन सुचविलेले आहे. 'Science Fiction' या संज्ञेला मराठी साहित्यात 'विज्ञान साहित्य' ही संज्ञा प्राप्त झालेली दिसते. साहित्यातील सर्जनशीलता या संकल्पनेत मान्य केली गेली आहे. भौतिक शास्त्राप्रमाणे काटेकोर लेखन इथे अभिप्रेत नाही. सर्जनाला या संकल्पनेत वाव आहे.

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj. Dist.Kolhapur. GADHINGLAJ

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 170- New Trends in Languages, Social Sciences and Commerce March-2019
UGC Approved Journal

**वर्तमान काळाची गतिमानता -**

आजचा काळ इतका गतिमान झालेला आहे की, आजचा शोध, आजचे विज्ञान, आजचे तंत्रज्ञान हे उद्या जुने होताना दिसत आहे. माघे पडताना दिसत आहे. माहिती व ज्ञानाचा जणू स्फोटच झाला आहे. त्यामुळे आजचा ज्ञानी हा उद्याचा अज्ञानी ठरताना दिसतो आहे. विज्ञान साहित्याच्या जाणीवांमुळे एक नव्या प्रकारचे भान येत आहे. नव्याप्रकारची जाणीव होताना दिसते आहे. वर्तमानकाळ व भविष्यकाळ किती गतिमान असेल याची जाणीव विज्ञानसाहित्याच्या भूमिकेतून, संकल्पनेतून व्यक्त झाल्याचे स्पष्ट होते. आपले रुढ साहित्य हे रम्य तारे, चंद्र, आकाश, पशु-पक्षी, निसर्ग, प्राणी, मानव, पृथ्वी, माती, संस्कृती, मानवी व्यवहार, भाव-भावना इत्यादी गोष्टींना, मानवी मनाला, स्वप्नांना, इच्छा-आकांक्षाना विचारात घेवून व्यक्त झाले आहे. विज्ञानसाहित्यात मात्र याच्यापेक्षा वेगळे अनुभव, वेगळे चित्रण दिसते. विज्ञानसाहित्यातील सारी सृष्टीच वेगळी आहे. अनुगर्भापासून आकाशगर्भापर्यंत पसरलेली ही विराट सृष्टी आहे. दुरच्या भविष्यातील विश्वाची चित्रे रंगवण्यात विज्ञान साहित्य रमलेले दिसते. सर्व विश्वाची, मानवी समाजाची चिंता करणे, काळजी करणे, भविष्यकाळाची चिंता करणे अशी उद्दिष्टे मुलभूत उद्दिष्टे म्हणून जाणवत नाहीत. परिणामरुपात मात्र जाणवतात. नैतिकतेचा संस्कार, नैतिकतेचा बोध यामध्ये हे साहित्य अडकत नाही.

विज्ञान साहित्याबद्दलच्या काही मत-मतांतरांचा मागोवा घेत असताना डॉ. व दि. कुलकर्णी यांनी काही वेगळे मत व्यक्त करुन, विज्ञानसाहित्याची नेमकी भूमिका, मांडणी, अभिव्यक्ती समजावण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात 'विज्ञानसाहित्य हे उद्याच्या प्रत्यक्ष वैज्ञानिक शोधांचे भविष्य वर्तवीत नसते, तर ते विज्ञान आणि तंत्रज्ञान हयाने व्यापलेल्या आक्रमिलेल्या उद्याच्या जगाची मनःस्थिती, भावस्थिती चित्रित करीत असते'.

विज्ञानसाहित्य हे उद्याच्या विज्ञानाची तंत्रज्ञानाची भाकिते करते, अशी भाकिते करणे हे विज्ञान साहित्याचे उद्दिष्ट आहे, असे जे मानले जाते ते व दि. कुलकर्णी यांना पटत नाही. म्हणून त्यांनी उपरोक्त उल्लेखिलेली विज्ञानसाहित्याची नेमकी भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**समारोप-**

नविन कल्पकता, नविन परिसर, नविन पार्श्वभूमी इत्यादी गोष्टींची विज्ञानसाहित्याला गरज असते. विज्ञान साहित्य हे विज्ञाननिष्ठ कल्पकतेचे साहित्य होय. विज्ञान साहित्याबद्दलचे रुढ संकेत फक्त अवलंबून चालणार नाही. रुढ संकेतांचा अंतर्भाव विज्ञानसाहित्यात होत राहीलच. उदा. अंतराळप्रवास, अंतराळवसाहती, यंत्रमानव, टाईम मशीन इत्यादी याशिवाय विज्ञानसाहित्य म्हणजे विज्ञान क्षेत्रातला फक्त चमकदार, रंगतदार कल्पनाविलास व बुध्दिविलास असे जे मानले जाते त्यांचेही चित्रण गरजेप्रमाणे स्वीकारताही येईल.

विज्ञानाला सोपे करुन मनोरंजक पध्दतीने विज्ञानाचे शिक्षण देण्याचा फक्त प्रयत्न म्हणजे विज्ञान साहित्य नव्हे म्हणून विज्ञान साहित्याच्या संकल्पनेची चिकित्सा करताना असे म्हणता येईल की, रुढ विज्ञान साहित्याच्या संकेतांचा आवश्यकतेनुसार विज्ञान साहित्यात वापर करताना मुलभूत असे विज्ञान साहित्याविषयीचे भान सुटता कामा नये. याची पुरेपूर जाणीव विज्ञानसाहित्याला असावी. विज्ञान साहित्य हे आशयाने विज्ञाननिष्ठ असावे, पण प्रकृतीने ते सर्जनशील साहित्यरुपच असणे आवश्यक आहे असे अंतिमतः म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ -**

१. विज्ञानसाहित्य आणि संकल्पना - संपादक व. दि. कुलकर्णी व निरंजन घाटे
२. यक्षांची देणगी - डॉ. जयंत नारळीकर
३. शवेटचा दिस - यशवंत रांजणकर
४. सृष्टिज्ञान - निरंजन घाटे
५. विज्ञानाचे शतक - निरंजन घाटे

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg. No. 2/12883 Estd. June - 1998 Tal. Gadhinglaj, Dist. Kolhapur. GADHINGLAJ



I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.